जामिया इस्लामिया इशातुल उलूम संचालित

# जामिया शिक्षणशास्त्र महाविद्यालय, अक्कलकुवा

## उच्च शिक्षण संचालनालय मार्फत अमलबजावणी करण्यात येणा-या शिष्यवृत्ती/सवलतीचा तपशील

| अ. क्र. | विषय | शासन निर्णय क्रमांक व दिनांक | तपशील |
|---|---|---|---|
| | **राज्यशासनाच्या शिष्यवृत्ती योजना** | | |
| १ | राज्य शासनाची खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती योजना | शिक्षण व समाजकल्याण विभाग, एससीएच/१०६३-यु.दि.१६/११/१९६४ शासन निर्णय दि.५/०२/२००४ नुसार सुधारीत दर रु.१००/-दरमहा | मंजूर संच-१२०८<br>१. कला, वाणिज्य व विधी शाखेच्या पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेले विद्यार्थी अर्ज करण्यासाठी पात्र आहेत.<br>२. नवीन मंजूरीचा अर्ज करणा-या विद्यार्थ्यांस इ.१२ वी च्या परीक्षेत किमान ६० टक्के गुण असणे आवश्यक |
| २ | गणित व भौतिकशास्त्र विषयातील प्रज्ञावान विद्यार्थ्यांना देण्यात येणारी शिष्यवृत्ती योजना | शिक्षण व समाजकल्याण विभाग, एससीएच/१४७०/१०७५-७२/एस. दि.१४.०५.१९७१शासन निर्णय दि.५/०२/२००४ नुसार सुधारीत दर रु.१००/-दरमहा | मंजूर संच - १०० (गणित ५० व भौतिक ५०)<br>१. विज्ञान शाखेच्या पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेले व गणित किंवा भौतिक शास्त्र हा प्रमुख विषय घेणारे विद्यार्थी अर्ज करण्यासाठी पात्र आहेत.<br>२. नवीन मंजूरीचा अर्ज करणा-या विद्यार्थ्यास इ.१२ वी च्या परीक्षेत किमान ६० टक्के गुण असणे आवश्यक |
| ३ | शासकीय विद्यानिकेतन शिष्यवृत्ती योजना | शिक्षण व समाजकल्याण विभाग, एससीएच/१४७०/१०७५७२/एस. दि.१४.०५.१९७१शासन निर्णय दि.५/०२/२००४ नुसार सुधारीत दर रु.१००/-दरमहा | मंजूर संच ८० (शासकीय विद्यानिकेतन पुसेगाव, अमरावती, औरंगाबाद, धुळे करिता प्रत्येक २० प्रमाणे)<br>१. राज्यातील शासकीय विद्यानिकेतन मधून इ.१०वी उत्तीर्ण झालेले विद्याची अर्ज करण्यासाठी पात्र आहेत.<br>२. नवीन मंजूरीसाठी शालांत प्रमाणपत्र परिक्षेत किमान ६० टक्के गुण असणे आवश्यक आहे.<br>३. अर्जासोबत कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घेतलेबाबतचे बोनाफाईड प्रमाणपत्र व शासकीय विद्यानिकेतन व्दारे प्राप्त इन्टायलमेंट कार्ड, १०वी उत्तीर्ण प्रमाणपत्राची प्रत आवश्यक |
| ४ | एकलव्य आर्थिक सहाय्य योजना | क्र. एससीएच-१०९५/(८१) मशि-४, दि.७/२/१९९६ | संच निर्धारित नाहीत या योजनेअंतर्गत होतकरु व गरीब विद्यार्थ्यांना पदव्युत्तर शिक्षण घेण्यासाठी योजना सुरु करण्यात आलेली आहे.<br>१. विधी, वाणिज्य व कला शाखेमध्ये पदवीसाठी किमान ६० टक्के व विज्ञान शाखेसाठी ७० टक्के गुण प्राप्त करणे आवश्यक आहे.<br>२. नुतनीकरणासाठी ५० टक्के गुण आवश्यक<br>३. पालकांची उत्पन्न मर्यादा रु.७५०००/- पर्यंत असणे आवश्यक<br>४. विद्यार्थी महाराष्ट्राचा रहिवासी असणे आवश्यक आहे. ५. संबंधीत लाभार्थी कुठेही पूर्ण किंवा अर्धवेळ नोकरी करणारा नसावा. पात्र विद्यार्थ्यांना नवीन मंजूरकरिता प्रथमवर्षी रु.५०००/- व नुतनीकरणासाठी दूस-या वर्षीरु.५०००/- अशा प्रकारे रक्कम विद्यार्थ्यांना मंजुर केली जाते. |
| ५ | गुणवान विद्यार्थ्यांनाआर्थिक सहाय्य योजना | शिक्षण व सेवायोजना विभाग, एएफईडी १०८३/१८१६३५ (२३१७) साशि-५ दि.१७.०५.१९८४ | मंजुर संच २०८<br>१. राज्यशासनाची माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परिक्षेत वरचा क्रमांक मिळविणा-या गुणवान विद्यार्थ्यांसाठी<br>२. नुतनीकरणासाठी कनिष्ठ स्तरावर किमान ५५ टक्के व वरिष्ठ स्तरांवर किमान ६५ टक्के गुण आवश्यक<br>३. विविध शुल्काची प्रतिपूती शासनाने मान्य केलेल्या दरानुसार केली जाईल.<br>४. इतर कोणत्याही शिष्यवृत्ती/सवलतीचा लाभ घेता येणार नाही.<br>५. पात्र विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य मंजूरीबाबतचे पत्र उच्च शिक्षण संचालनालयाकडून पाठविण्यात येते. |
| ६ | राज्य शासनाची दक्षिणा अधिचात्रवृत्ती | शिक्षण व समाजकल्याण विभाग, शासन निर्णय एससीएच/१०६५ यु. दि.१९.०९.१९६५ | मंजूरी संच - ७६<br>१. राज्यातील गुणवत्ता धारक विद्यार्थ्यांना पदव्युत्तर शिक्षण घेण्यासाठी सदर शिष्यवृत्ती दिली जाते.<br>२. शासकीय विज्ञान संस्था / महाविद्यालये तसेच विद्यापीठांकडून प्राप्त झालेल्या आवेदनपत्रानुसार मंजूर संचाच्या प्रमाणात शिष्यवृत्ती देण्यात येते.<br>३. विद्यार्थ्यांचे अभ्यासक्रमांतील समाधानकारक प्रगती अहवालानुसार |

## जामिया इस्लामिया इशातुल उलूम संचालित

# जामिया शिक्षणशास्त्र महाविद्यालय, अक्कलकुवा

## उच्च शिक्षण संचालनालय मार्फत अमलबजावणी करण्यात येणा-या शिष्यवृत्ती/सवलतीचा तपशील

| अ. क्र. | विषय | शासन निर्णय क्रमांक व दिनांक | तपशील |
|---|---|---|---|
| ७ | शासकीय अधिसंशोधन अधिछात्रवृत्ती | शिक्षण व सेवायोजना विभाग, शासन निर्णय क.एससीएच/१०८२/४९ ९९ विशि-३, दि.१३.०८.१९८५ | मंजूर संघ-१४<br>१. राज्यातील विद्यापीठव व महाविद्यालयीन स्तरांवरील विद्यार्थ्यांना त्यांच्या विषयामध्ये पीएचडी करता यावी यासाठी शिष्यवृत्ती दिली जाते.<br>२. सदर शिष्यवृत्तीसाठी राज्यस्तरांवरील व महाविद्यालयासाठी १२ संच<br>३. शिक्षण संचालनालयाच्या स्तरांवर गठीत केलेल्या समिती मार्फत प्राप्त आवेदन पत्रांची छाननी करुन राज्यस्तरांवरील ३ संचाची निवड केली जाते.<br>४. महाविद्यालयीन स्तरांवर प्राचार्यानी गठीत केलेल्या समितीकडून ११ संचाची निवड केली जाते.<br>५. संबंधीत विद्यार्थ्यांने पीएचडी संबंधी विद्यापीठाकडे नोंदणी करुन संबंधीत मार्गदर्शकाने शिफारस करणे आवश्यक आहे. ६. संबंधीत छात्र कोठेही सेवेत नसावा तसेच त्याने इतर कोणतही शिष्यवृत्ती घेतलेली नसावी.<br>७. विद्यार्थी महाराष्ट्राचा रहिवासी असणे आवश्यक. |
| ८ | जवाहरलाल नेहरु विद्यापीठ शिष्यवृत्ती | एससीएच/१०८२/१५११६०/२१७३ जनरल ५, दि.०७/०५/१९८३ | मंजूर संच-०१<br>जवाहरलाल नेहरु विद्यापीठ, नवी दिल्ली यांचेकडून विहीत नियमानुसार निवड करुन त्या विद्यापीठात शिकत असलेल्या महाराष्ट्रीयीन विद्याव्यामवून एका विद्यार्थ्याची निवड केली जाते. |
| ९ | राज्य शासनाची अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती भाग-२ (अल्पसंख्यांक विकास विभाग) | अविवि-२०११/प्र.क्र.४४/११/का-६, दि.१४.१०.२०११ | मंजूर संच २०००<br>या योजनेसाठी इयत्ता १२ वी नंतरच्या अभ्यासक्रमात शिक्षण घेणा-या अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजना भाग-२ मध्ये इयत्ता बारावी नंतर कला, वाणिज्य, विज्ञान पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणा-या अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ अनुज्ञेय आहे. सदर शिष्यवृत्ती योजनेसाठी प्रत्यक्ष वार्षिक शैक्षणिक शुल्क किया रु.५००० यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढी रक्कम शिष्यवृत्ती म्हणून देण्यात येते. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय यांच्यामार्फत पात्र विद्याव्यांच्या बँक खातेवर शिष्यवृत्ती रक्कम जमा करण्यात येते. |
| १० | माजी सैनिकांच्या पाल्यांना आर्थिक सहाय्य | एनडीएफ/१०७९ २२२९२०/(५३७) साशि दि.१४/१/१९८५ | महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र दाखल केलेल्या मेजर, नौदल, वायूदल दर्जाच्या किंवा त्यापेक्षा कमी हुद्याच्या माजी सैनिकांना शैक्षणिक सवलती दिल्या जातात. |
| ११ | स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांना आर्थिक सहाय्य | शिक्षण व सेवायोजना विभाग, शानि क्र.एमआयएस १४६५/एच, दि. २३/११/१९६५ | स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांना शैक्षणिक सवलती दिल्या जातात. |
| १२ | राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना | शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३३२/तांशि-४, दि.०७/१०/२०१७ | उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील शासकीय / अशासकीय अनुदानित / अंशतः अनुदानित (टप्पा अनुदान विना अनुदान)/ कायम विनाअनुदानित महाविद्यालयामध्ये व अकृषी विद्यापीठे व त्या विद्यापीठा अंतर्गत असलेल्या उपकेंद्रामधील (खाजगी अभिमत विद्यापीठ / स्वयं अर्थसहाय्यीत खाजगी विद्यापीठे वगळून) व्यावसायीक व बिगर व्यावसयीक अभ्यासक्रमांना प्रवेश घेणा-या ज्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबाची वार्षिक उत्पन्न मर्यादा रु.८.०० लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे अशा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांकरीता शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क व निर्वाह भत्ता आदि लाभ शासन निर्णयाप्रमाणे देण्यात येतात.<br>दि. ३१.०३.२०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार सदर शिष्यवृत्तीसाठी लाभार्थी विद्यार्थ्यांच्या कुटुंबाची वार्षिक उत्पन्न मर्यादा रु.६.०० लाखावरुन रु.८.०० लाख इतकी वाढविण्यात आलेली आहे. |